# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१९ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## दाभोलकर हत्या प्रकरण: 'अंनिस' सर्वोच्च न्यायालयात जाणार

पुणे दि.१८ (प्रतिनिधी)- मुंबई उच्च न्यायालयाने डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील आरोपी सचिन अंदुरे याला जामीन मंजूर केला असून, त्याच्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची भूमिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) मंगळवारी पत्रकार परिषदेत मांडली.

'आमचा न्यायव्यवस्थेवर अजूनही विश्वास आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत मिळाल्यानंतर, त्याचा अभ्यास करून सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहोत,' असे 'अंनिस'च्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य मिलिंद देशमुख, अ‍ॅड. श्रीपाल ललवाणी आणि नंदिनी जाधव यांनी सांगितले. संघटनेचे कार्यकर्ते दत्तात्रय जाधव, नागेश कवडे या वेळी उपस्थित होते.

'यापूर्वी दाभोलकर हत्या प्रकरणातील तीन आरोपींची सबळ पुराव्यांअभावी मुक्तता करण्यात आली आहे. त्याविरोधात उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. तसेच या प्रकरणातील आरोपी शरद कळसकर याला मिळालेल्या जामिनाविरोधातही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहणार असून, त्यासाठी 'अंनिस'कडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आता मुंबई उच्च न्यायालयाने आरोपीला जामीन दिला आहे. या निर्णयाची प्रत मिळताच, त्याचा अभ्यास करून सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहोत,'असे देशमुख यांनी सांगितले.

# राहुल नार्वेकरांनी अधिकारांची मर्यादा ओलांडली

## शिवसेना पक्ष सुनावणी: कपिल सिब्बलांचा वर्मी घाव, सुप्रीम कोर्टात अटीतटीचा युक्तिवाद!

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलल्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी आज पुन्हा एकदा अत्यंत आक्रमक आणि जोरदार युक्तिवाद केला. या सुनावणीत सिब्बल यांनी थेट महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय आधी होणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक होते, परंतु अध्यक्षांनी आणि निवडणूक आयोगाने ही संपूर्ण प्रक्रिया उलट राबवून कायद्याचे उल्लंघन केले, असा दावा त्यांनी केला.

विधिमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्ष यातील मूलभूत कायदेशीर फरक सर्वोच्च न्यायालयासमोर मांडताना सिब्बल यांनी स्पष्ट केले की, केवळ ३९ आमदारांचे बहुमत सोबत आहे म्हणून शिंदे गटाला 'मूळ शिवसेना मानणे पूर्णपणे चुकीचे आहे. राजकीय पक्षाची रचना ही केवळ लोकप्रतिनिधींच्या संख्येवर ठरत नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला.

घटनेच्या १० व्या अनुसूचीचा आधार घेत सिब्बल यांनी सांगितले की, जर दोन-तृतीयांश आमदारांचा गट वेगळा होतो, तर त्यांना दुसऱ्या कोणत्याही पक्षात विलीन होणे बंधनकारक असते. परंतु शिंदे गटाने कोणत्याही पक्षात विलीनीकरण केले नाही आणि उलट 'आम्हीच मूळ पक्ष आहोत' असा दावा केला, जो कायद्याच्या चौकटीत पूर्णपणे अवैध ठरतो.

विधानसभा अध्यक्षांनी २०१८ च्या सुधारित घटनेऐवजी निवडणूक आयोगाच्या जुन्या रेकॉर्डवर असलेल्या १९९९ च्या घटनेचा आधार घेतला, यावर सिब्बल यांनी तीव्र आक्षेप घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्देशांनुसार दोन्ही गटांच्या संमतीने सादर झालेल्या २०१८ च्या घटनेलाच आधार मानणे बंधनकारक होते. अध्यक्षांनी घेतलेले हे निर्णय चुकीचे असून यामुळे भविष्यात मोठे घटनात्मक पेच निर्माण होऊ शकतात, असे सांगत शिंदे यांच्यासोबत गेलेले आमदार कायदेशीरदृष्ट्या अपात्रच ठरतात, समजा एखाद्या राजकीय पक्षाचा एक गट निवडणूक आयोगाकडे जाऊन आपणच खरा पक्ष असल्याचा दावा करत असेल आणि त्याच वेळी त्या गटातील आमदारांवर अपात्रतेची कारवाई सुरू असेल, तर 'खरा पक्ष कोणता' हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असू शकतो. मात्र, तो निर्णय अपात्रतेबाबतच्या निर्णयावर आधारित असणे आवश्यक आहे असे कपिल सिब्बल यांनी न्यायालयात म्हटले.

जर ते आमदार अखेरीस अपात्र ठरले, तर विधिमंडळातील त्यांचे संख्याबळ विचारात घेतले जाणार नाही. त्यामुळे, जरी सुभाष देसाई यांचे म्हणणे बरोबर मानले की, हे प्रकरण निवडणूक आयोगासमोर चालू शकते, तरीही 'राजकीय पक्ष कोणता' हे ठरवण्याची प्रक्रिया ही अपात्रतेच्या याचिकांवरील निर्णयावर अवलबून असायला हवी. अन्यथा, ही समस्या प्रत्येक वेळी उद्भवत राहील. 'सुभाष देसाई' प्रकरणात यावर आधीच निर्णय झालेला असताना, विधानसभा अध्यक्ष संविधानाकडे अशा प्रकारे कसे पाहू शकतात? समजा, एखादा पक्ष निवडणूक आयोगाकडे जाऊन दावा करतो की तोच खरा पक्ष आहे, आणि त्याच वेळी त्या पक्षाचे विधिमंडळ सदस्य अपात्रतेच्या नोटीसचा विषय बनलेले आहेत. 'खरा पक्ष कोणता' हे ठरवण्याचे स्वातंत्र्य निवडणूक आयोगाला नक्कीच आहे, परंतु हा निर्णय अपात्रतेबाबतचा निर्णय झाल्यानंतरच घेतला गेला पाहिजे. कोणता पक्ष आहे हे निश्चित करण्याची प्रक्रिया ही अपात्रतेच्या याचिकेवरील निर्णयावर अवलंबून असायला हवी. जर त्या आमदारांना अखेरीस अपात्र ठरवण्यात आले, तर विधिमंडळातील त्यांचे संख्याबळ विचारात घेतले जाणार नाही. अध्यक्षांनी १० व्या अनुसूचींतर्गत असलेल्या आपल्या अधिकारांची मर्यादा ओलांडली आहे आणि १० व्या अनुसूचीशी विसंगत अशी कृती करून राजकीय पक्षाच्या नेतृत्वातील बदलांकडे दुर्लक्ष केले आहे. आमदारांची बहुसंख्या हेच त्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतात, असा निष्कर्ष अध्यक्षांनी काढला आहे. विधानसभा अध्यक्षांचे म्हणणे आहे की, 'पक्षप्रमुख' यांचा निर्णय म्हणजे 'राजकीय पक्षाची इच्छा' नव्हे; आणि नेतृत्वात फूट पडलेली असताना पक्षप्रमुखांचा निर्णय हा पक्षाचा निर्णय मानला जाऊ शकत नाही. ते असे कसे म्हणू शकतात? हे मान्य आहे की मीच पक्षप्रमुख आहे आणि मीच त्यांची नियुक्ती केली होती. माझ्याच नेतृत्वाखाली निवडणूक लढवली गेली आणि माझ्याच नेतृत्वाखाली त्यांना पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळाले आणि तरीही, त्यांना मान्यता देण्याची गरज नाही, असे ते म्हणतात, असा अटीतटीचा युक्तीवाद कपिल सिब्बल यांनी केला आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली आजची सुनावणी संपली असून उद्या पुन्हा युक्तिवाद होणार आहे.

### कपिल सिब्बल यांचे दावे बिनबुडाचे, माझाच निर्णय खरा ठरणार-राहुल नार्वेकर

यवतमाळ दि.१८ (प्रतिनिधी)- कपिल सिब्बलांनी केलेले दावे बिनबुडाचे असल्याची टीका नार्वेकरांनी केली. ते यवतमाळमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकारासाठी युक्तिवाद करत आहे, ते काय म्हणतात याच्यातून काही सिद्ध होत नाही असे नार्वेकर म्हणाले. मी जी भूमिका घेतली आहे, मी जो निर्णय दिलेला आहे तो कायद्याच्या चौकटीत राहून दिलेला निर्णय आहे. सुप्रीम कोर्टाने जे निकष दिले, त्या निकषाच्या आत राहून, त्या आधारावरतीच हा निर्णय दिल्याचे नार्वेकर म्हणाले. त्यांचे जे वकिल असतील त्यांच्या संदर्भात ते युक्तिवाद करतील, याचाच अर्थ असा नाही की ते जे म्हणताय ते सत्य आहे. अध्यक्षांनी काय ठरवलं हे त्यांना कसं समजलं पहिला प्रश्न हा आहे असे नार्वेकर म्हणाले. असे बिनबुडाचे आरोप करुन कोणताही फरक पडत नाही, मी दिलेला निर्णय हा अत्यंत शाश्वत निर्णय असल्याचे नार्वेकर म्हणाले. या निर्णयामध्ये कोणताही बदल होईल असं मला वाटत नाही असेही ते म्हणाले.

## अन्नभेसळीविरोधात तुकाराम मुंढेंचा धडाका

### देवेंद्र फडणवीसांकडून कारवाईचे कौतुक



मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- आयएएस तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून संपूर्ण राज्यात भेसळयुक्त खाद्यपदार्थ आणि आरोग्यास हानीकारक उत्पादनांवर कारवाईचा धडाका लावला आहे. एफडीएच्या पथकांकडून दररोज राज्यभरात धाडी टाकून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या तसेच अस्वच्छता बाळगणाऱ्या हॉटेल्स, डेअरी व दुकानांचे परवाने थेट निलंबित केले जात आहेत. दरम्यान, मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या धडक आणि आक्रमक मोहिमेची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी तुकाराम मुंढे यांच्या कामाच्या संदर्भात तसेच त्यांनी सुरू केलेल्या मोहिमेसंदर्भात विचारले असता फडणवीस म्हणाले, भेसळयुक्त पदार्थांमुळे एखाद्याच्या जीवाला धोका असतो. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता होती आणि ही कारवाई सध्या सुरू आहे, याचा मला आनंद आहे. तसेच यापुढेही एफडीएची अशी धडक कारवाई सुरू राहील, असे फडणवीस यांनी म्हटले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यात ११ ऑगस्ट रोजी सह्याद्री अतिथीगृहावर एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून राज्यात सुरू असलेल्या धडक कारवायांची सविस्तर माहिती उपमुख्यमंत्र्यांना दिली. यावर कठोर पावले उचलत, दूध, पनीर, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या गुन्हेगारांवर थेट 'मकोका' अंतर्गत कारवाई करून त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याचे कडक आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

## 'एल निनो'च्या तीव्र प्रभावामुळे आगामी काळात परिस्थिती अधिक चिंताजनक होण्याची शक्यता; हवामान विभागाकडून चिंता

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- देशासह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या पावसाने मोठी दडी मारल्याचे चित्र आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, देशात सध्या तब्बल १३ टक्के पर्जन्य तूट नोंदवली गेली आहे. देशभरात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली असून, 'एल निनो'च्या तीव्र प्रभावामुळे आगामी काळात ही परिस्थिती अधिक चिंताजनक होण्याची शक्यता पुणे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ सखाराम सानप यांनी व्यक्त केली आहे.

जुलै महिन्यात राज्यातील काही भागांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक महत्त्वाची धरणे १०० टक्के भरली आहेत. मात्र, दुसऱ्या बाजूला राज्यातील बहुतांश भागांत अद्यापही सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला आहे. ऑगस्ट महिन्याचे दोन आठवडे उलटून गेले तरीही राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने पूर्णपणे पाठ फिरवली आहे.

विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. ऑगस्ट महिना कोरडा गेल्यासारखा झाला असतानाच, आगामी सप्टेंबर महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामुळे प्रशासनासह नागरिकांची आणि शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

पावसाच्या भरवशावर अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी वेळेवर पेरण्या करून पिके घेतली होती. मात्र, पीक वाढीच्या मुख्य काळातच पावसाने दडी मारल्यामुळे उभी पिके करपू लागली आहेत. यामुळे पिकांवर मोठे संकट निर्माण झाले असून, शेतकरी वर्ग सध्या प्रचंड आर्थिक आणि मानसिक अडचणीत सापडला आहे. जर सप्टेंबर महिन्यातही मुसळधार पाऊस झाला नाही, तर राज्याला मोठ्या दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील वर्षीच होण्याची शक्यता

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढल्या वर्षीच होण्याची शक्यता वर्तवली आहे. एसआयआरची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर निवडणुका घ्याव्या अशी केंद्रीय आयोगाची भूमिका आहे. २० जिल्हा परिषदा आणि २९१ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. एसआयआरची प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात अशा सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्येक राज्यांना केल्या आहेत. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. २० जिल्हा परिषदा आणि २९१ पंचायत समित्या या निवडणुका यंदाच्या डिसेंबर किंवा पुढील वर्षाच्या जानेवारी २०२७ आधी होण्याची शक्यता कमी आहे. शिवाय १०५ नगरपंचायतीच्या निवडणुका फेब्रुवारी २०२७ मध्ये संपणार आहे. त्यामुळे पुढील वर्षी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित होण्याची शक्यता आहे. तर ५०टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या २० जिल्हा परिषद आणि त्यांच्या अंतर्गत पंचायत समितीच्या निवडणुकांचे सुप्रीम कोर्टाच्या निकालावरती अवलंबून आहेत.

## 'होर्मुझ आता अमेरिकेचा भूभाग', ट्रम्प यांनी शेअर केला खळबळजनक नकाशा, इराणही आक्रमक



वॉशिंग्टन दि.१८ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर होर्मुझ सामुद्रधुनीचा नकाशा शेअर केला आहे. ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनी आता अमेरिकन भूभाग म्हणून दाखवला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वी होर्मुझवर पूर्ण नियंत्रण मिळवल्याचा दावा केला होता. यानंतर इराणबरोबर वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी हा नकाशा शेअर केला आहे.

इराणने मात्र अमेरिकेने नाकाबंदी मागे घेतल्याशिवाय आणि इतर मागण्या मान्य केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. इराणकडून वाटाघाटी करण्यात आघाडीवर असणारे मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी सरकारी वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित केलेल्या भाषणात ही घोषणा केली. अमेरिका जून महिन्यातील करारात ठरलेल्या सामंजस्य करारातील अटींची पूर्तता करत नाही, तोपर्यंत जलमार्ग बंदच राहील, असे गालिबाफ यांनी स्पष्ट केले.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर २८ फेब्रुवारी रोजी केलेल्या संयुक्त हल्ल्यानंतर प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले. ८ एप्रिलपासून बॉम्बहल्ल्यांना विराम मिळाला असला, तरी होर्मुझची सामुद्रधुनी आणि त्याच्या आसपासच्या परिसरात अद्यापही अधूनमधून चकमकी सुरू आहेत. युद्धाची सुरुवात झाल्यापासून होर्मुझ इराणच्या नियंत्रणाखाली आहे. इराणने या मार्गावरून जाणाऱ्या जहाजांना परवानगी घेणे आणि वाहतूक सेवा शुल्क अदा करणे बंधनकारक केले आहे.

## भारतात २०२७ पर्यंत खाद्यपदार्थ महाग होऊ शकतात

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- २०२७ पर्यंत भारतात खाण्यापिण्याच्या वस्तूंचे दर वाढू शकतात. हा इशारा मल्टीनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस फर्म जेपी मॉर्गनने दिला आहे. अहवालानुसार, भारत सरकारवर ३ लाख कोटी रुपयांच्या सबसिडीचा बोजा वाढेल.

फर्मने दावा केला आहे की, महागाईचा परिणाम संपूर्ण जगावर होईल. खतांची कमतरता, भू-राजकीय तणाव आणि शक्तिशाली अल निनो वादळामुळे हे संकट अधिक गडद होईल.

२०२७ च्या पहिल्या सहामाहीत जागतिक स्तरावर खाण्यापिण्याच्या वस्तूंचे दर ५टक्के पर्यंत वाढू शकतात. २०२६ च्या पहिल्या सहामाहीशी तुलना केल्यास, त्यावेळी हा आकडा २.८टक्के होता. भारतासाठी हा इशारा अधिक महत्त्वाचा आहे, कारण देशात आधीच खते खूप महाग आहेत.

## पंढरपुरातील विशेष पुनर्वसन धोरणास मत्रिमंडळाची मंजुरी; जायकवाडीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६,४७७ कोटींची तरतूद

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विकास प्रकल्पांसह पायाभूत सुविधा, सिंचन, क्रीडा, पुनर्वसन, वित्तीय सुधारणा आणि औद्योगिक क्षेत्राशी संबंधित अनेक महत्त्वाच्या निर्णयांना मंजुरी देण्यात आली. पंढरपूर येथील विशेष पुनर्वसन धोरणापासून ते जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीपर्यंत अनेक महत्त्वाचे निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले.

श्री क्षेत्र पंढरपूर येथील विशेष पुनर्वसन धोरणाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर आणि वाणिज्य संकुलाच्या विकास आराखड्यातील ३ हजार ९९३ कोटी ९० लाख रुपयांच्या कामांना गती मिळणार आहे. पंढरपूरचे धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व, वारकरी भाविकांची वाढती संख्या, स्थानिक परिस्थिती आणि प्रकल्पाची तातडीची गरज लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष पॅकेज तयार करण्यात आले असून, जिल्हा प्रशासनाने त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर केला होता.

जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांच्या आर्थिक तरतुदीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे गोदावरी खोऱ्यातील सिंदफणा नदीवरील माजलगाव धरणाच्या कामांना गती मिळणार आहे. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, परभणी आणि नांदेड या पाच जिल्ह्यांतील सुमारे १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. याशिवाय औद्योगिक पाणीपुरवठा, मत्स्यव्यवसाय आणि विद्युतनिर्मितीलाही चालना मिळणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात ट्रेड्स प्लॅटफॉर्म प्रणालीचा वापर करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसेच कंत्राटदारांची प्रलंबित देयके वेळेत देणे अधिक सुलभ होणार आहे.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम-२०१३ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. महाखनिज २.० पोर्टलवर खाणक्षेत्रे, साठवणूक क्षेत्रे आणि वाहतुकीची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. परराज्यातून येणाऱ्या गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी आता वाहतूक परवाना बंधनकारक करण्यात आला आहे.

राज्य शासनाने वित्त विभाग आणि नियोजन विभागाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, नियोजन विभागाकडील अर्थसंकल्पाशी संबंधित विषय आणि पदे वित्त विभागाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत. त्यामुळे दोन्ही विभागांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## क्षेपणास्त्र हल्ला होण्याची शक्यता, सुरक्षित स्थळी आश्रय घ्या, संयुक्त अरब अमिरातीने जारी केला हाय अलर्ट

अबुधाबी दि.१८ (वृत्तसंस्था)- संयुक्त अरब अमिरातीने आपल्या देशातील नागरिकांना संभाव्य क्षेपणास्त्र हल्ल्याचा मोठा इशारा देत तात्काळ जवळच्या सुरक्षित इमारतीमध्ये किंवा आडोशाला जाण्याचे निर्देश दिले आहेत. संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई संरक्षण यंत्रणेने देशाच्या दिशेने येणाऱ्या क्षेपणास्त्राच्या धोक्याचा शोध घेतल्यानंतर राष्ट्रीय आपत्कालीन संकट आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने ही आणीबाणीची सूचना जारी केली.

यूएईच्या गृहमंत्रालयाने नागरिकांच्या मोबाईलवर पाठवलेल्या अलर्ट संदेशात म्हटले आहे की, 'सध्याची परिस्थिती आणि संभाव्य क्षेपणास्त्र धोका लक्षात घेता, नागरिकांनी त्वरित जवळच्या सुरक्षित इमारतीमध्ये आश्रय घ्यावा'. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने अधिकृतपणे स्पष्ट केले की, त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालीने देशाच्या दिशेने आलेला क्षेपणास्त्र धोका शोधून काढला. गेल्या काही महिन्यांत यूएईमध्ये अशा प्रकारचा तातडीचा अलर्ट जारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी मे आणि जुलै महिन्यातही असाच इशारा देण्यात आला होता. दरम्यान, संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई संरक्षण दलाने आलेल्या क्षेपणास्त्रांचा यशस्वीपणे हवेतच खात्मा केल्याचे वृत्त असून परिस्थिती आता नियंत्रणात व सुरक्षित असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## हाफिज सईदसह ६ फरार पाकिस्तानी आरोपींविरोधात खटला चालणार; परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

नवी दल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- 'दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी आणि दहशतवाद्यांना कठोर शिक्षा मिळावी यासाठी भारत आवश्यक ती सर्व पावले उचलत राहील', अशी भूमिका परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी मांडली. मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तानात पळून गेलेल्या आरोपींवर अनुपस्थितीत खटला चालवण्याची प्रक्रिया मुंबई पोलिसांनी सुरू केली आहे. यानंतर परराष्ट्र मंत्रालयाने ही प्रतिक्रिया दिली. लष्कर-ए-तोयबाचा सूत्रधार हाफिज सईद आणि झकी-उर-रहमान लखवी याच्यासह सहा आरोपींचा यात समावेश आहे.

परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी २००८ च्या मुंबई हल्ल्यातील फरार आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्याच्या निर्णयावर भाष्य केले. जगाने दहशतवादी कारवायांचे गांभीर्य समजून घ्यावे, अशी भारताची अपेक्षा असल्याचे जयस्वाल म्हणाले.

'हे विषय अत्यंत गंभीर आहेत आणि आम्ही याकडे अत्यंत गांभीर्याने पाहत आहोत. यामागची भीषणता जगाने समजून घ्यावी, अशी आमची इच्छा आहे. भारताला दहशतवादाचा मोठा फटका बसला आहे. सीमापार दहशतवादासह संपूर्ण दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांत आम्ही अनेक प्रयत्न केले आहेत. आमचा हा लढा भविष्यातही सुरू राहील. दहशतवादाचा पराभव करण्यासाठी आवश्यक पावले सातत्याने उचलत राहू,' असे जयस्वाल म्हणाले.

## मित्रपक्षांना संपवण्यासाठीच भाजपची धडपड; एसआयआरच्या कामात भाजप कार्यकर्त्यांचा हस्तक्षेप-रोहित पवार

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- एसआयआर साठी काम करणारी लोकं भाजपचे कार्यकर्ते आहेत. भाजपकडून एक ॲप तयार करण्यात आले आहे, ज्यामध्ये मतदार आपल्या विचाराचा आहे किंवा नाही हे पाहिले जाते. ती यादी घेऊन ही लोकं बीएलओकडे जातात आणि मग एसआयआरची प्रक्रिया पूर्ण करतात. यात भाजपचा मतदार असेल आणि त्यांचे कागदपत्रे नसतील तर ती पूर्ण केली जातात. जर विरोधी विचाराचा मतदार असेल तर त्याचे नाव काढून टाकले जात आहे, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

महाराष्ट्रात जवळपास २ कोटी ५० लाख मतदार कमी होऊ शकतात अशी भीती व्यक्त करताना रोहित पवार म्हणाले की, ज्यांचे मृत्यू झाले किंवा जे स्थलांतरित झाले त्यांची नावे रद्द झाली तर ठीक आहे, पण इतरांचे काय? हे केवळ आमच्या मतदारसंघात सुरू नसून भाजपच्या मित्रपक्षांच्या मतदारसंघातही असे बदल केले जात आहेत. २०२९ मध्ये त्यांना कुबड्या नको आहेत हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते, त्याचीच दक्षता भाजपकडून घेतली जात आहे. बीएलओ हा सरकारी अधिकारी असतो, तर बीएलए हा राजकीय पक्षाचा पदाधिकारी असतो. महाविकास आघाडी म्हणून आम्ही सर्वांनी एकत्रित बीएलए दिले आहेत. या संपूर्ण प्रकारातून भाजप आपल्याच मित्रपक्षांना संपवत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. आमदार रोहित पवार म्हणाले की, कुठल्याही मंत्र्यांचा निर्णय बदलण्याचे कायदेशीर अधिकार आता मुख्यमंत्र्यांकडे आले आहेत, यापूर्वीसुद्धा मंत्र्यांचे काहीच चालत नव्हते, पण आता मुख्यमंत्री काहीही करू शकतात हे कागदोपत्री सिद्ध झाले. अजित पवार यांचा पक्ष आणि एकनाथ शिंदे यांचा पक्ष हे सर्व किती दिवस सहन करणार, हे पाहावे लागेल, असे ते म्हणाले.

## दमदार कामगिरी करणाऱ्या १७ खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी निवड

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- भारत सरकारने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ जाहीर केले असून यंदाच्या पुरस्कारांच्या यादीत एक मोठी बाब समोर आली आहे. यंदा एकाही खेळाडूची मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली नाही. तर विविध क्रीडा प्रकारांमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या १७ खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण यादीत एकाही क्रिकेटपटूचा समावेश नाही.

क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. दरवर्षी देशासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक आणि संस्थांचा राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांच्या माध्यमातून गौरव केला जातो. यंदाच्या पुरस्कारांसाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती (निवृत्त) अरुण कुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने नावांची शिफारस केली होती.

यंदा अर्जुन पुरस्कारासाठी एकूण १७ खेळाडूंची निवड झाली आहे. ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, बुद्धिबळ, हॉकी, कबड्डी, नेमबाजी, रोइंग आणि पॅरा-स्पोर्ट्स अशा विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. ॲथलेटिक्समध्ये तेजस्विन शंकर, मोहम्मद अजमल व्ही. आणि प्रियंका गोस्वामी यांची निवड झाली आहे. बॅडमिंटनमध्ये ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना अर्जुन पुरस्कार मिळणार आहे. बॉक्सिंगमध्ये नरेंद्र यांची निवड करण्यात आली आहे.

बुद्धिबळात विदित संतोष गुजराती आणि दिव्या जितेंद्र देशमुख यांना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. डेफ शूटिंगमध्ये धनुष श्रीकांत यांची निवड झाली आहे. हॉकीमध्ये लालरेमसियामी आणि राजकुमार पाल यांना अर्जुन पुरस्कार मिळणार आहे. कबड्डीमध्ये सुरजीत आणि पूजा यांची निवड झाली आहे. याशिवाय पॅरा-शूटिंगमध्ये रुद्रांश खंडेलवाल, पॅरा-ॲथलेटिक्समध्ये एकता भयान, रोइंगमध्ये अरविंद सिंह आणि शूटिंगमध्ये अखिल श्योराण यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

# हम होंगे कामयाब...

नुकताच देशाचा ८०वा स्वातंत्र्य दिन देशभर आणि जगातील सर्व भारतीय वकिलातीत साजरा करण्यात आला. त्यावेळी काही ठिकाणी, विशेषत: उपक्रमशील चांगल्या शाळात, नक्कीच ङ्गहम होंगे कामयाब, एकदिनङ्ख हे गीत सामूहिकपणे गायले गेले असणार. जेव्हा निरागस शाळकरी मुले हे गीत गातात तेव्हा मनात एक सात्त्विक समूहभावना, देशभक्ती जागृत होते. संवेदनशील मनांना हे गीत भावुक करून टाकते. मात्र फार थोड्या लोकांना हे माहीत असेल की ते अमेरिकी कृष्णवर्णीयांच्या ‘नागरी हक्क चळवळी’तून निर्माण झाले आहे. मुळात ते न्यू जर्सीतील मेथडीस्ट चर्चच्या रेव्ह. चार्ल्स अल्बर्ट टिंडली यांनी रचलेले एक भक्तिगीत होते! त्याचे मूळ शब्द होते, ‘आय विल ओव्हरकम सम डे.’ अध्यात्मिक मार्गावर पुढे जाताना मी ईश्वरकृपेने विकारांवर, माझ्या मनाच्या दुर्बलतेवर कसा विजय मिळवेन त्याचे वर्णन रेव्हरंडसाहेबांनी केले होते.

आज जरी इतिहासाचा फारसा अभ्यास नसलेले लोक अमेरिकेकडे ‘लोकशाहीचा मानदंड’ म्हणून बघत असले तरी वास्तव अगदी वेगळे आहे! जवळजवळ ४०० वर्षे अमेरिकेत गुलामगिरीची पद्धत बिनबोभाट सुरू होती हा त्या देशाचा काळाकुट्ट इतिहास आहे! आफ्रिकेतील गरीब असहाय्य माणसांना जनावरांसारखे पकडून अमेरिकेत आणले जायचे. अमेरिकेत आधीपासून स्थायिक असलेल्या आदिवासींना हाकलून, गोळ्या घालून, स्थापन झालेल्या युरोपीय, विशेषत: इंग्लंडच्या वसाहतीसाठी, गुमान ढोर मेहनत करणाऱ्या मजुरांची गरज असायची. अमेरिकी लोक कष्ट करायला तयार नसल्याने तंबाखू आणि ऊस मळ्यात काम करायला कृष्णवर्णीयांना जनावरासारखे पकडून आणले जाई. जहाजात गुराढोरांसारखे कोंबून बसवल्याने काही जण गुदमरून मरत. काही प्रदीर्घ समुद्रप्रवासात नाना रोग होऊन तर काही उपासमारीने मरत. पण अमेरिकी मळेमालकांना त्याने काहीही फरक पडत नसे. हा होता अमेरिकेचा मानवी हक्कांबाबतचा खरा इतिहास!

मात्र अतिशय उदात्त भावना आणि धार्मिक श्रद्धा व्यक्त करणारे मेथडीस्ट चर्चच्या रेव्ह. चार्ल्स अल्बर्ट टिंडली यांनी रचलेल्या भक्तिगीताचे शब्द, पुढे अमेरिकेच्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या खासदार झालेल्या, ल्युसील सिमन्स यांना प्रेरणादायी वाटले. त्यांनी ते दक्षिण कॅरोलीना राज्यातील ‘चार्ल्सस्टन सिगार फॅक्टरी’त १९४५ साली झालेल्या कामगारांच्या संपात गायले.

मूळ गीतातील ‘आय’ (I) या शब्दाच्या जागी मग स्वाभाविकत:च ‘वी’ (We) हा शब्द आला. कामगार संघटनेच्या श्रीमती झिल्फिया हॉर्टन यांनी मग ते टेनेसीमधील हायलँडर फोक स्कूलमधल्या कामगार आणि नागरी हक्क चळवळीच्या कार्यकर्त्यांना शिकवले. नंतर पीटर सिगर यांनी संगीत दिलेले हे गाणे गाय कॅरॅव्हान यांनी १९५९ मध्ये ‘धरणे आंदोलनात’ आणि तुरुंगातील कैद्यांच्या विरोध निदर्शनात गायले.

वॉशिंग्टनला १९६३ साली निघालेल्या मोर्चामध्ये जॉन बाएझ यांनी सामूहिकपणे गायलेले हे गीत मग आंतरराष्ट्रीय मानवी हक्क चळवळींचे मुक्तिगीतच होऊन बसले! राष्ट्रपती लिंडन बी. जॉनसन यांनी तर त्यांच्या १९६५ सालच्या ‘मतदान हक्क सुधारणा कायद्या’बद्दल बोलतानाच्या सिनेटम धील भाषणात या ओळी उद्धृत केल्या होत्या! प्रसिद्ध कवी आणि नाटककार गिरीजाकुमार माथुर यांनी दूरदर्शनमध्ये कार्यरत असताना या गाण्याचा सुंदर हिंदी अनुवाद करून त्याला सतीश भाटिया यांच्या मदतीने सुंदर अनुरूप संगीत दिले. दूरदर्शनच्या वाद्यवृंदाकडून गावून घेतल्यावर ते अनेकदा राष्ट्रीय महत्त्वाच्या दिवशी दूरदर्शनवर वाजवले गेले. त्यामुळे अनेक शाळात ते शिकवले गेले आणि खूप लोकप्रियही झाले. त्यानंतर प. बंगालमध्ये प्रसिद्ध बंगाली लोकगीत गायक हेमांगा बिस्वास यांनी त्याचा बंगाली अनुवाद ‘अमरा कोरबो जोय’ गायल्यावर ते प. बंगाल आणि शेजारच्या बंगला देशातही पसरले. पुढे ते भूपेन हजारिका यांच्या आवाजात ध्वनिमुद्रितही करण्यात आले. त्यानंतर १९७१च्या बंगलादेश मुक्तिसंग्राम ातही ते गाजले होते.

सर्वांना परिचित असलेले त्या जबरदस्त गाण्याचे शब्द होते – हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब, एक दिन! हो हो मन में है विश्वास, पूरा है विश्वास, हम होंगे कामयाब एक दिन... दूरदर्शनच्या वाद्यवृंदाने सगळा आशय अतिशय अनुरूप संगीत देऊन जिवंत केला होता! केवळ एखाद्या देशाच्याच नव्हे तर सर्व मानवजातीच्या अनेक समस्या कायमच्या सुटू शकतात असा आश्वासक संदेश देणारे हे गाणे एकंदर भारतीय समाजाच्या संवेदनहीनतेमुळे फक्त गाणेच बनून राहिले. त्याचा विचार एक सामूहिक निर्णय किंवा टिकाऊ निर्धार होऊ शकलाच नाही. उलट आपली मागणी राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हिंसाचार आवश्यक आहे, अत्यंत बेबंद वर्तन गरजेचे आहे, ही धारणा दृढ होत गेलेली दिसते आहे तेव्हा गाण्यातील सुंदर कवितेला, उदात्त विचारांत किती अर्थ शिल्लक आहे, माहीत नाही. पण आजही ते शांत सात्त्विक शब्द खूप महत्त्वाचे वाटतात. सगळीकडे जाणीवपूर्वक पसरवण्यात येत असलेल्या अशांती, द्वेष, तिरस्काराच्या पार्श्वभूमीवर अमेरिकी चर्चेमध्ये शांत स्वरात घुमलेले ते रेव्ह. चार्ल्स अल्बर्ट टिंडली यांचे शब्द समाजाला अंतर्मुख करून नवा उदात्त मानवी संदेश देऊ शकतील असे उगाचच वाटत राहते – ङ्गहोगी शांति चारों ओर, होगी शांति चारों ओर, होगी शांति चारों ओर, एक दिन. हो हो मन में है विश्वास, पूरा है विश्वास, होगी शांति चारों ओर, एक दिन. देशात जातीजातीत, धर्माधर्मात, वेगवेगळ्या भाषासमुदायात क्षुद्र स्वार्थासाठी रुजवल्या जाणाऱ्या परस्परद्वेषाच्या पार्श्वभूमीवर ‘लेके हाथोमे हाथ, हम चलेंगे साथ साथ’ या ओळी तर अस्वस्थ करतात – हम चलेंगे साथ-साथ, डाले हाथोंमें हाथ, हम चलेंगे साथ-साथ, एक दिन. हो हो मनमें है विश्वास, पूरा है विश्वास, हम चलेंगे साथ-साथ, एक दिन. जेव्हा कधी कुणालाही अटक होईल, तुरुंगात टाकले जाईल अशी भीती वाटत असताना – ङ्गनहीं डर किसीका आज, नहीं भय किसीका आज, नहीं डर किसीका, आजके दिन, हो हो मन में है विश्वास, पूरा है विश्वास, नहीं डर किसीका आजके दिन. हे शब्द काल्पनिक का होईना पण दिलासा देणारे वाटतात. अतिशय भावुकपणे निरागस शालेय मुले हे गीत गातात तेव्हा आपल्यालाही स्थिती सुधारेल असे पूर्वी वाटायचे! पण अलीकडची बिघडत चाललेली, किंबहुना जाणीवपूर्वक बिघडवण्यात येत असलेली राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहिल्यावर गाण्याचे पहिले शब्द एक प्रश्नचिन्ह बनून आपल्यासमोर येतात – (क्या) हम होंगे कामयाब, किसी दिन?

# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र

**पाऊस** पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.




शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी ‘जलसंधारण दिन’ साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी ‘महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर’, रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.

**जलसंधारण म्हणजे काय –** पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे. महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे ‘पाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाही’ हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२ च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून ‘जलक्रांन्ती’ घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले

**जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात –** जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४ नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला. आज जलयुक्त शिवार २.०च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

**योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ –** महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. ‘मागेल त्याला शेततळे’ योजनेला २०१६ मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वत:ची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली. ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४ मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग सम तल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

**देशातील प्रेरणादायी उपक्रम –** राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक ‘जोहड’ या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले. जलतज्ज्ञ आणि ‘वॉटर मॅन ऑफ इंडिया’ म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मि ळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

**नागरिकांनी काय करायचे –** शासन आपले काम करीत आहे; परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक-सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी.

जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल. म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला !जलसंधारणातून ‘बारमाही हिरवा महाराष्ट्र!’ घडवूया!

**– प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

# मानवतेचा हातच संकटातील खरा आधार

**दरवर्षी** १९ ऑगस्ट हा दिवस ‘जागतिक मानवतावादी दिन’ म्हणून जगभर साजरा केला जातो. संकटाच्या काळात मानवतेची सेवा करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना अभिवादन करणे, युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, साथीचे रोग, विस्थापन, गरिबी आणि विविध मानवी संकटांमध्ये अडकलेल्या लोकांच्या वेदनांकडे जगाचे लक्ष वेधणे तसेच प्रत्येक मानवाच्या जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करण्याचा संदेश देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मानवतावाद म्हणजे केवळ संकटाच्या वेळी मदत करणे नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून समान सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव मनात दृढ करणे होय. संकटग्रस्तांच्या मदतीसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांचे योगदान या दिवशी विशेषत्वाने स्मरणात घेतले जाते. त्यामुळे जागतिक मानवतावादी दिन हा माणुसकीच्या सामर्थ्याचा, करुणेचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जागतिक जागर ठरतो.

१९ ऑगस्ट २००३ रोजी बगदाद येथील संयुक्त राष्ट्रांच्या कॅनाल हॉटेलवरील बॉम्बस्फोटात २२ मानवतावादी कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला; त्यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्रांनी १९ ऑगस्ट हा ‘जागतिक मानवतावादी दिन’ म्हणून घोषित केला. हा दिवस संकटग्रस्तांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांच्या धैर्याला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे. मानवतावादाची संकल्पना मुळात अत्यंत व्यापक आहे. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या वेदनेशी आपले भावनिक नाते जोडले जाणे आणि शक्य त्या पद्धतीने त्याच्या मदतीला धावून जाणे म्हणजे मानवतावाद. यात दया आणि सहानुभूतीबरोबरच समानता, न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार अंतर्भूत आहे. एखादी व्यक्ती कोणत्या धर्माची आहे, कोणत्या जातीची आहे, तिची भाषा कोणती आहे, ती कोणत्या प्रदेशातून आली आहे किंवा तिची आर्थिक परिस्थिती काय आहे, याचा विचार न करता तिच्या संकटात मदतीचा हात पुढे करणे ही मानवतावादी वृत्ती होय. मानवतावाद माणसामाणसांतील कृत्रिम भेद ओलांडतो. म्हणूनच मानवतावाद हा कोणत्याही एका धर्माचा, देशाचा किंवा समाजाचा विचार नसून संपूर्ण मानवजातीला जोडणारे सार्वत्रिक मूल्य आहे.

आजच्या जगाकडे पाहिले तर मानवतावादी कार्याची गरज किती मोठी आहे, हे सहज लक्षात येते. जगाच्या विविध भागांत युद्धे आणि सशस्त्र संघर्ष सुरू आहेत. लाखो लोकांना आपली घरे सोडून विस्थापित व्हावे लागत आहे. अनेक कुटुंबांचे उपजीविकेचे साधन नष्ट होत आहे. मुलांचे शिक्षण खंडित होत आहे. रुग्णालये आणि आरोग्यसेवा बाधित होत आहेत. अन्न, पाणी आणि औषधांची टंचाई निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत असुरक्षित होते. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि आजारी व्यक्तींना संकटाचा अधिक तीव्र परिणाम सहन करावा लागतो. त्यामुळे मानवतावादी मदत ही केवळ अतिरिक्त सुविधा नसून अशा परिस्थितीत जीवन वाचविण्यासाठी अत्यावश्यक व्यवस्था बनते. युद्धाच्या काळात मानवतावादी कार्याचे महत्त्व विशेष वाढते. युद्ध कोणत्याही कारणाने सुरू झाले असले तरी त्याची सर्वाधिक झळ सामान्य नागरिकांना बसते. घरांवर बॉम्बहल्ले होतात, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त होतात, रुग्णालयांवर ताण वाढतो आणि मूलभूत सुविधा कोलमडतात. अशा वेळी मानवतावादी कार्यकर्ते अन्न, पाणी, औषधे, वैद्यकीय सेवा, निवारा आणि सुरक्षिततेशी संबंधित मदत पोहोचविण्याचे काम करतात. अनेक वेळा ते अशा प्रदेशांत काम करतात, जिथे स्वतःच्या जीवाला मोठा धोका असतो. तरीही मानवतेच्या सेवेसाठी ते आपले कर्तव्य पार पाडतात. म्हणूनच मानवतावादी कार्यकर्त्यांची सुरक्षितता ही संपूर्ण जगाची जबाबदारी आहे. मदतकार्य करणाऱ्या व्यक्तींवर हल्ले होणे म्हणजे मानवतेवरच हल्ला होय.

मानवतावादी कार्य केवळ युद्धाच्या प्रदेशांपुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या वेळीही त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी यांसारख्या आपत्तींमुळे हजारो कुटुंबांचे जीवन विस्कळीत होते. घरांचे नुकसान होते, पिके नष्ट होतात, जनावरे मृत्युमुखी पडतात आणि रोजगाराची साधने हिरावली जातात. अशा वेळी तातडीने अन्न, पाणी, कपडे, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र मदतकार्य केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे न राहता पुनर्वसन आणि पुनर्निर्माणाशी जोडले गेले पाहिजे. आपत्तीग्रस्त व्यक्तीला पुन्हा स्वावलंबी बनविणे आणि तिच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देणे हा मानवतावादी दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे. हवामानबदलामुळे मानवतावादी संकटांचे स्वरूप आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, चक्रीवादळे आणि इतर हवामानविषयक संकटांचा परिणाम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर अधिक होतो. ग्रामीण भागातील शेतकरी, भूमिहीन कामगार, आदिवासी समुदाय, स्थलांतरित कामगार आणि गरीब कुटुंबे या संकटांना अधिक असुरक्षित असतात. त्यामुळे मानवतावादाचा विचार पर्यावरणीय न्यायाशी जोडणे आवश्यक झाले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, शाश्वत विकास, आपत्तीपूर्व तयारी आणि स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण यांचा मानवतावादी कार्यात समावेश झाला पाहिजे. भारतीय समाजाच्या परंपरेत मानवतावादाला फार मोठे स्थान आहे. संत परंपरेने माणुसकी, समता, बंधुभाव आणि करुणेचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेची भूमिका मांडली. भारतीय संविधानाची प्रस्तावनाही न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर समाजाची उभारणी करण्याचा संदेश देते. त्यामुळे आधुनिक मानवतावादाची मूल्ये भारतीय लोकशाहीच्या मूलभूत विचारांशी अतिशय जवळची आहेत. मानवतावादाचा केंद्रबिंदू म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. मदत करताना गरजू व्यक्तीकडे केवळ ‘दयेचे पात्र’ म्हणून पाहणे योग्य नाही. संकटग्रस्त व्यक्तीलाही स्वाभिमान, निर्णयक्षमता आणि अधिकार असतात. त्यामुळे मानवतावादी मदत ही सन्मानपूर्वक आणि गरजू व्यक्तीच्या गरजा लक्षात घेऊन दिली पाहिजे. अन्न किंवा कपडे देणे ही तातडीची गरज भागविणारी कृती असली तरी त्यापुढे जाऊन रोजगार, शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मदत घेणाऱ्या व्यक्तीला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे सक्षमीकरण होय. मानवतावादी कार्यामध्ये स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपत्तीच्या वेळी सरकारी यंत्रणा मदतीसाठी प्रयत्नशील असते; परंतु प्रत्येक व्यक्तीपर्यंत तातडीने पोहोचणे नेहमी शक्य होत नाही. अशा वेळी स्थानिक स्वयंसेवक, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचतगट, विद्यार्थी संघटना आणि समुदायाधारित संस्था महत्त्वाची भूमि का बजावतात. त्यांना स्थानिक परिस्थिती, भाषा आणि गरजांची माहिती असल्यामुळे मदतकार्य अधिक परिणामकारक ठरते. संकटाच्या काळात समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन काम केल्यास उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर होतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचविता येते. युवकांची भूमिका या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. युवकांमध्ये ऊर्जा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सामाजिक सहभागाची क्षमता मोठी असते. रक्तदान, अन्नवाटप, आपत्तीग्रस्तांना मदत, जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्यशिबिरे आणि सामाजिक माध्यमांद्वारे मदतसंकलन अशा अनेक क्षेत्रांत युवक प्रभावी योगदान देऊ शकतात. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान आणि कौशल्ये विकसित न करता सामाजिक संवेदनशीलता, सहानुभूती आणि स्वयंसेवेची भावना निर्माण केली पाहिजे. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ रोजगारप्राप्ती नसून जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविणे हेही आहे. दिव्यांग व्यक्तींच्या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोन अधिक संवेदनशील असणे आवश्यक आहे. आपत्तीच्या वेळी स्थलांतर, सुरक्षित निवारा, वाहतूक, आरोग्यसेवा आणि माहिती मिळिवताना दिव्यांग व्यक्तींना अनेक अडचणी येऊ शकतात. म्हणून आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना सर्वसम ावेशक असणे आवश्यक आहे. माहिती सर्वांना समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करणे, प्रवेशयोग्य निवारे तयार करणे, सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे आणि आवश्यकतेनुसार प्रशिक्षित स्वयंसेवकांची मदत देणे ही समाजाची जबाबदारी आहे. मानवतावादाची खरी कसोटी समाजातील सर्वाधिक असुरक्षित व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहो चतो की नाही, यात आहे. डिजिटल युगाने मानवतावादी कार्यासाठी नवीन संधी निर्माण केल्या आहेत. सामाजिक माध्यमांमुळे एखाद्या आपत्तीची माहिती काही क्षणांत जगभर पोहोचू शकते. डिजिटल निधीसंकलन, स्थाननिश्चिती तंत्रज्ञान, उपग्रहचित्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती व्यवस्थापनाच्या आधुनिक साधनांमुळे मदतकार्य अधिक जलद आणि परिणामकारक करता येते. मात्र डिजिटल माध्यमांमध्ये चुकीची माहिती, अफवा आणि बनावट मदत आवाहनेही वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहितीची सत्यता तपासणे, पारदर्शकता राखणे आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर मानवतेच्या सेवेसाठी झाला पाहिजे; मानवी असुरक्षिततेचा गैरफायदा घेण्यासाठी नव्हे. मानवतावादाचा संबंध सामाजिक न्यायाशीही आहे. संकट निर्माण झाल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहे; परंतु समाजातील विषमता, गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, आरोग्यसेवेतील तफावत आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या संकटांच्या मूळ कारणांकडेही लक्ष दिले पाहिजे. जे समुदाय आधीपासूनच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल आहेत, ते आपत्तीच्या काळात अधिक असुरक्षित होतात. म्हणून मानवतावादी कार्याबरोबर सामाजिक सक्षमीकरणाची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक संरक्षणाची समान संधी मिळाली तर संकटांचा सामना करण्याची तिची क्षमता वाढते.

जागतिक मानवतावादी दिन हा त्यामुळे केवळ मानवतावादी कार्यकर्त्यांना अभिवादन करण्याचा दिवस नाही; तो आपल्या सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा घेणारा दिवस आहे. आपल्या आसपास एखादा वृद्ध मदतीच्या प्रतीक्षेत आहे का, एखादे गरीब कुटुंब अडचणीत आहे का, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधाराची गरज आहे का, एखाद्या दिव्यांग व्यक्तीला सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे का किंवा एखादा आपत्तीग्रस्त नागरिक मदतीची अपेक्षा करीत आहे का, याचा विचार करण्याची ही संधी आहे. मानवतावाद मोठ्या घोषणांमध्ये नसतो; तो छोट्या-छोट्या कृतींमध्ये जगतो. एखाद्याला पाणी देणे, रक्तदान करणे, जखमीला रुग्णालयात पोहोचविणे, संकटात असलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, या कृतीही मानवतेच्या सेवाच आहेत.

आज जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे; परंतु या प्रगतीला मानवी संवेदनशीलतेची जोड मिळाली नाही तर ती अपूर्ण राहील. उंच इमारती, वेगवान वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास यांना खरे मूल्य तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित, सन्मानाने आणि आशेने जगू शकते. म्हणूनच मानवतावादी मूल्ये ही आजच्या जगाची गरज आहेत. संघर्षाऐवजी शांतता, द्वेषाऐवजी प्रेम, भेदभावाऐवजी समता, उदासीनतेऐवजी सहानुभूती आणि स्वार्थाऐवजी सहकार्य स्वीकारण्याची आवश्यकता आहे. १९ ऑगस्टचा जागतिक म ानवतावादी दिन आपल्याला याच मूल्यांची आठवण करून देतो. संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणारे मानवतावादी कार्यकर्ते हे जगाच्या सामूहिक सद्सद्विवेकबुद्धीचे प्रतीक आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या जीवनात मानवतेची मूल्ये रुजविणे. मानवतावाद हा एका दिवसापुरता मर्यादित राहू नये; तो आपल्या कुटुंबात, शाळेत, महाविद्यालयात, कार्यस्थळी आणि समाजजीवनात सतत आचरणात आणला पाहिजे. कारण माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी मोठ्या पदाची किंवा संपत्तीची आवश्यकता नसते; आवश्यक असते ती दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव आणि मदतीसाठी पुढे येण्याची तयारी.

मानवतेचा खरा विजय तेव्हा होतो, जेव्हा संकटात सापडलेल्या व्यक्तीला आपण एकटे पडू देत नाही. तिच्या अश्रूंमध्ये आपले अश्रू मिसळण्याची, तिच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि तिच्या अंधारात आशेचा दिवा पेटविण्याची तयारी ठेवतो. जागतिक मानवतावादी दिनाचा संदेश म्हणून आपण एवढेच लक्षात ठेवू या की, जग बदलण्याची सुरुवात मोठ्या घोषणांपासून नव्हे, तर एका माणसाने दुसऱ्या माणसासाठी पुढे केलेल्या मदतीच्या हातापासून होते. संकट कितीही मोठे असो, माणुसकीची शक्ती त्याहून मोठी असते. म्हणूनच मानवतेचा हात धरू या, करुणेची वाट चालू या आणि प्रत्येकाच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारासाठी संवेदनशील समाजाची निर्मिती करू या. हाच जागतिक मानवतावादी दिनाचा खरा संदेश आणि मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# वेरूळ जैन मंदिरात वार्षिक यात्रा व पार्श्वनाथ मोक्ष कल्याणकनिमित्त शोभायात्रा

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – श्री पार्श्वनाथ ब्रह्मचारी आश्रम जैन गुरुकुल व सकल जैन समाज वेरूळ यांच्या वतीने १९ ऑगस्ट रोजी भगवान पार्श्वनाथ मोक्ष कल्याणक निमित्ताने भव्य शोभायात्रा व अभिषेक पूजन इत्यादीचे आयोजन करण्यात आले मुनिश्री नियम सागरजी महाराज याचा सानिध्यात होणार आहे.



यावेळी सकाळी सात वाजता वेरूळ गुरुकुल मधून भव्य शोभायात्रा काढण्यात येईल पहाड मंदिर भगवान पार्श्वनाथ मंदिरात अभिषेक पूजन व निर्वाण लाडू चढवण्याच्या बोली करण्यात येणार आहे. याच निमित्ताने छत्रपती संभाजी नगर येथील श्रीमती शांतीदेवी देवेंद्र कुमार सोनी रोहित शिल्पा संस्कार संस्कृती व संपूर्ण सोनी परिवार यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. तर स्वर्गीय धरमचंद पाटणी यांच्या स्मृतिदितार्थ सुभाषचंद धीरजकुमार मयूर चिराग चेतन पाटणी परिवार यांच्यातर्फे जल पानाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी ब्र मनिष भैय्या व प्रमुख अतिथी म्हणून सुमित ठोले, रवी इंगलवार, शांतीलाल गुलाबचंद पहाडे, गौतमचंद ठोले, अनिल गंगवाल यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दिनेश गंगवाल महामंत्री डॉ प्रेमचंद पाटनी, मदनलाल पांडे, निर्मलकुमार ठोले, गुलाबचंद बोराळकर, पर्यवेक्षक सुकुमार नवले यांनी केले आहे, अशी माहिती अतुल बांदे पियूष गंगवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

# जुलै महिन्यात तब्बल ११ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – महावितरणने वीजचोरीविरुद्ध राज्यभरात धडक मोहीम सुरु केली असून गेल्या चार महिन्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर वर्गवारीमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरी उघड झाली आहे. यामध्ये गेल्या जुलै महिन्यात पर्दाफाश झालेल्या तब्बल ११ हजार ३२ वीजचोऱ्यांचा समावेश आहे. थेट तारेच्या हूकद्वारे व मीटरमध्ये फेरफार केलेल्या १५ हजार ९६५ प्रकरणांत ३० कोटी ३६ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे आढळून आले तर उर्वरित ३ हजारांवर ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे.

गेल्या एप्रिल महिन्यापासून महावितरणने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची धडक तपासणी मोहीम सुरु केली आहे. यामध्ये सर्वाधिक कोकण प्रादेशिक विभागात ७४९६, नागपूर- ४५२१, छत्रपती संभाजीनगर- ४५९७ आणि पुणे प्रादेशिक विभागात २९८५ अशा एकूण १९ हजार ५९९ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. यापैकी १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. त्यातील ६६२९ ग्राहकांनी १४ कोटी १२ लाख रुपयांचा भरणा केला आहे. तसेच सर्वच वीजचोरी प्रकरणी तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कम देखील आकारण्यात येत आहे. आतापर्यंत ४९५९ प्रकरणांत १ कोटी ८५ लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले आहे.

वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी वीजचोरीविरुद्ध एप्रिलपासून मोहीम सुरु करण्यात आली आहे. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोऱ्या उघड झाल्या होत्या. दि. १ जुलैपासून आणखी तीव्र झालेल्या या धडक मोहिमेत ११ हजार ३२ ठिकाणी थेट तारेच्या हूकद्वारे किंवा मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या चोरांना महावितरणने दणका दिला आहे. यातील ८४६२ ठिकाणी विजेच्या चोरीचे मूल्यांकन झाले असून संबंधितांना १५ कोटी ११ लाख रुपयांचे वीजबिल देण्यात आले आहे. त्यापैकी ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचा वीजबिल भरणा झाला आहे. तर उर्वरित प्रकरणांत चोरीद्वारे वापरलेल्या युनिटनुसार वीजबिल व दंडात्मक तडजोड शुल्क आकारण्याचे (मूल्यांकनाचे) काम सुरु आहे.

गेल्या जुलै महिन्यात छत्रपती संभाजीनगर- २३६५, कोकण- ४०८४, नागपूर- २३२४ आणि पुणे प्रादेशिक विभागात २२५९ अशा एकूण ११ हजार ३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. त्यातील ८४६२ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून १५ कोटी ११ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे स्पष्ट झाले व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचे तडजोड शुल्क देखील आकारण्यात आले आहे.

वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा दंडासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध भारतीय विद्युत कायद्याचे कलम १३५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. थकबाकीदारांनी अन्य ठिकाणाहून वीजवापर केल्याचे आढळून आल्यास वीजचोरीची कारवाई करण्यात येत आहे.

# आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची कार्यशाळा

## शासकीय आर्थिक व्यवहारात नियमपालनाला प्राधान्य-प्रधान महालेखापाल सुहासिनी गोतमारे

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- शासकीय आर्थिक व्यवहारांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि विहित नियमांचे काटेकोर पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक व्यवहार अधिक सुसूत्र करण्यासाठी यंत्रणांमधील समन्वय अधिक गरजेचा आहे, असे प्रतिपादन प्रधान महालेखापाल सुहासिनी गोतमारे यांनी आज येथे केले.

महालेखापाल कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी संयुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

वरिष्ठ उपमहालेखापाल जितेंद्र बी. गुप्ता, सहसंचालक रेहाना काझी, वरिष्ठ कोषागार अधिकारी वैजनाथ शेळके, वरिष्ठ लेखा अधिकारी डी. एन. कोतुरवार, जिल्हा कोषागार अधिकारी, अपर कोषागार अधिकारी, विविध विभागांचे आहरण व संवितरण अधिकारी तसेच लेखा व कोषागार विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. श्रीमती गोतमारे म्हणाल्या की, आर्थिक व्यवहारांचे लेखांकन करताना योग्य लेखाशीर्षांचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे चुकीच्या नोंदी टाळणे, चुकीचे लेखावर्गीकरण, प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करणे तसेच लेखाविषयक त्रुटींचे तातडीने निराकरण करणे याकडे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे. कार्यशाळेत उपयोगिता प्रमाणपत्रे, जीएसटीसंदर्भातील बाबी, लेखांकन प्रक्रिया, चुकीचे लेखावर्गीकरण, प्रलंबित देयके अशा विविध आर्थिक व लेखाविषयक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. वरिष्ठ उपमहालेखापाल जितेंद्र बी. गुप्ता यांनी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्यास्तरावर करावयाच्या लेखाविषयक कार्यवाहीबाबत मार्गदर्शन केले. श्रीमती रेहाना काझी यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. सुत्रसंचालन उपकोषागार अधिकारी सय्यद इरफान यांनी केले.

# मल्लिकार्जुन यांच्या सभेनंतर मैदान शुद्धीकरण केल्याप्रकरणी भीमशक्तीकडून मुंडण करून निषेध

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – झारखंडमधील हजारीबाग येथील रामलीला मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या सभेनंतर कथितरीत्या धार्मिक विधी करून मैदानाचे शुद्धीकरण केल्याच्या घटनेचा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



या घटनेचा निषेध म्हणून १८ ऑगस्ट रोजी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांच्या आदेशानुसार तसेच उपाध्यक्ष दिनकर औकिर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुंडण आंदोलन करण्यात आले.

निवेदनानुसार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी हजारीबाग येथील रामलीला मैदानावर मल्लिकार्जुन खरगे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. सभा झाल्यानंतर काही दिवसांनी, ११ ऑगस्ट रोजी आरएसएसशी संबंधित असल्याचे नमूद केलेल्या श्रीराम सेना धर्मार्थ सेवा न्यासाच्या माध्यमातून याच मैदानाचे शुद्धीकरण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कृतीमुळे देशातील दलित व मागासवर्गीयांच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला असून, जातीय भावनेतून त्यांच्याप्रती द्वेष व्यक्त करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. मल्लिकार्जुन खरगे हे बौद्ध समाजातील असल्याचा उल्लेख करत, त्यांच्या सभेनंतर मैदानाचे शुद्धीकरण करणे ही सामाजिक भेदभावाची व सनातनी मानसिकतेची लक्षणे असल्याचा आरोप करण्यात आला.


निवेदनात पुढे म्हटले आहे की, भाजपला देशातील दलित व मागासवर्गीयांची मते हवी असली तरी त्यांचा सन्मान व स्वाभिमान मान्य नसल्याचे या घटनेतून स्पष्ट होते. तसेच आरएसएस-भाजपपुरस्कृत श्रीराम सेना धर्मार्थ सेवा न्यासाच्या या कृतीचा निषेध करण्यात आला.

या घटनेच्या निषेधार्थ भीमशक्तीच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे. प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच संबंधित राजकीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदनावर दिनकरदादा ओंकार, शांतिलाल गायकवाड, पंडितभाई नवगिरे, संतोष भिंगारे, सतीश नरवडे, प्रेम चव्हाण, भाऊसाहेब नवगिरे, कैलास जोंबडे, किशोर जाधव, विनोद कोरडे, राजुभाऊ मुंडे, मीनाताई काकडे, प्रियांका दभाडे, विश्वंभर भालेराव, अप्पासाहेब खरात, प्रकाश प्रधान, संजय शेजुळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जैन टॅग यांच्या वतीने राजाबाजार येथे प्रथमच पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – श्री १००८ पार्श्वनाथ भगवान यांच्या मोक्ष कल्याणक महोत्सवानिमित्त तसेच छत्रपती संभाजीनगर शहरात प्रथमच आचार्य श्री विनम्रसागरजी गुरुदेव यांच्या ससंघ सान्निध्यात पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.



जैन टॅग यांच्या वतीने आयोजित हा भक्तिमय कार्यक्रम बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता राजाबाजार येथील हिराकाका प्रांगणात होणार आहे.

'एक शाम पार्श्वनाथ चालीसा के नाम' या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पार्श्वनाथ भगवान यांची चालीसा पठण करून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या मंगलमय कार्यक्रमासाठी पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी जैन टॅगचा अध्यक्षा जयश्री लोहाडे, उपाध्यक्ष उज्वला पाटणी, सचिव पूजा झांझरी आणि कोषाध्यक्ष सीमा बडजाते यांच्यासह संस्थापक अध्यक्षा अनुपमा दगडा व दीपिका बडजाते आणि जैन टॅगच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या या भक्तिमय आयोजनामुळे राजाबाजार परिसरात धार्मिक वातावरण निर्माण होणार असून, सकल जैन समाजातील भाविकांसाठी हा विशेष आध्यात्मिक सोहळा ठरणार आहे.

# सुधारित बीजभांडवल व जिल्हा उद्योग केंद्रात सुशिक्षीत बेरोजगारांना अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार व उद्योग उभारणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी सुधारित बीजभांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना राबविण्यात येते. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र सुशिक्षित बेरोजगारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित बीजभांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे संबंधित बँकांकडे शिफारशीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जांचे वाटप दि. ११ मे पासून सुरू करण्यात आले आहे. अर्ज स्वीकारण्याची सुधारित अंतिम मुदत दि. ३१ ऑगस्ट पर्यंत आहे. या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. इच्छुक सुशिक्षित बेरोजगारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

# महाराष्ट्र सीसीने पटकावले इंडिपेंडन्स चॅम्पियन ट्रॉफीचे विजेतपद

## आर्यन फायटर्सला उपविजेतेपद; स्वातंत्र्यदिनानिमित्त रंगली क्रिकेट स्पर्धा





छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ओम साई क्रिकेट क्लब, आर्यन फायटर्स आणि महाराष्ट्र सीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडिपेंडन्स चॅम्पियन ट्रॉफी-२०२६' क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद महाराष्ट्र सीसी संघाने पटकावले. अंतिम सामन्यात महाराष्ट्र सीसीने आर्यन फायटर्सवर मात करत ट्रॉफीवर आपले नाव कोरले. आर्यन फायटर्सला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेचा हा दुसरा हंगाम असून, महाराष्ट्र सीसी, आर्यन फायटर्स आणि ओम साई क्रिकेट क्लब या तीन संघांमध्ये स्पर्धेतील सामने रंगले. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेला क्रिकेटप्रेमींचा चांगला प्रतिसाद मिळाला. विविध सामन्यांमध्ये खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उल्लेखनीय कामगिरी करत उपस्थितांची दाद मिळवली.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र सीसी आणि आर्यन फायटर्स यांच्यात चुरशीची लढत झाली. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी विजयासाठी अखेरपर्यंत प्रयत्न केले. मात्र, महाराष्ट्र सीसीच्या खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत सरस कामगिरी करत सामन्यात बाजी मारली. दमदार सांघिक खेळाच्या जोरावर महाराष्ट्र सीसीने स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावे केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ओम साई कन्स्ट्रक्शनचे संचालक रोहिदास गायकवाड तसेच आर्यन फायटर्सचे कर्णधार व आरव ट्रॅव्हल्सचे संचालक गणेश इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले. व्हिजन कल्याण इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.चे संचालक दीपक इंगळे आणि कृष्णा थोरात पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. दत्ता आव्हाड यांनी बॉल स्पॉन्सर म्हणून सहकार्य केले.

वसीम पठाण, सय्यद चांद, समीर खान, लखन सलामपुरे आणि विलास गायकवाड यांनीही स्पर्धेच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंमध्ये सांघिक भावना, शिस्त, परस्पर सन्मान आणि खिलाडूवृत्ती जोपासण्यास प्रोत्साहन मिळाले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने झालेल्या या क्रिकेट स्पर्धेने क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

# सूर - तालाच्या श्रवणीय अविष्काराने रंगला स्वरयांश म्युझिक अकॅडमीचा संगीत सोहळा



पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) – भारतीय शास्त्रीय संगीतातील विविध राग, त्यातील ताना , आलाप, रागांच्या सुरावटीवर आधारित वैविध्यपूर्ण गाण्यांच्या श्रवणीय अविष्काराने आरती पाठक – जाधव संचलित स्वरयांश म्युझिक अकॅडमीचा संगीत सन्मान सोहळा उत्साहात रंगला. मोशी येथील डी ॲड्रेस सोसायटीच्या क्लबहाऊस मध्ये रविवारी सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमास सुप्रसिद्ध गायिका भारती न्यायाधीश, किर्ती कस्तुरे आणि संगीत समिक्षक विजय न्यायाधीश यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

विद्यार्थी कलावंतांच्या सादरीकरणाने रंगलेल्या या संगीत सोहळ्याचा प्रारंभ सरस्वती पूजन आणि दिपप्रज्वलनाने करण्यात आला. त्यानंतर आराध्या कर्णे, नीलिमा गाडगे, अद्रिका गावंडे, अनय धारासूरकर , आर्या कुलकर्णी, आस्मी वाडीकर, धनश्री कुलकर्णी, ज्ञानेश्वरी इंगळे, हर्षवी चांदोरे, हिरल गोरे, इशिता चव्हाण, जिविका पाटील, मीत किनागे , नित्या थोरात, प्रांजल जाधव, राजवी निमळे, शौर्या नाईकनवरे, श्रीनिका सांगळे, क्षृती घाडी, स्पृहा लोखंडे , स्वाती कुलकर्णी, यशिता चोरडिया, वैदेही पाटील, आराध्या मोरे, रिया देशमुख, मार्तंड तिखे, मंगेश जाधव, रजनी गवळी, अद्रिका मेश्राम, अश्विनी सातपुते, अयांश जाधव, पुनम पानसरे , मनीषा तिकडे, स्नेहा धारासूरकर, प्रियंका गावंडे या कलावंतांच्या वैविध्यपूर्ण स्वराविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. स्वरयांश म्युझिक अकॅडमीच्या संचालिका यांनी ' कुहू कुहू बोले कोयलीया ' तर भारती न्यायाधीश यांनी ' विसरु नको श्रीरामा मला ' या गाण्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी विशेष दाद दिली. दाद - प्रतिसादात रंगलेल्या या संगीत सोहळ्याच्या समारोपात किर्ती कस्तुरे यांनी गायलेले ' मर्मबंधातली ठेव ही ' या नाट्यगीताला रसिकांनी भरभरून दाद दिली. प्रथेप्रमाणे भैरवीने त्यांनी या संगीत सोहळ्याचा समारोप केला.

# गुरुदेव समंत भद्र विद्या मंदिर मध्ये ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी ) – गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये स्वातंत्र्य दिनाचा ८० वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमात प्रभात समयी वेरूळ गावातून विद्यार्थ्याची भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. स्वातंत्र्य दिन चिरायू हो. जय जवान जय किसान. या घोषणांनी सर्व वेरूळकारांचे लक्ष या प्रभात फेरीकडे आकर्षित करण्यात आले. प्रशालेत यावेळी आयोजित विविध कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे विश्वस्त दिनेशकुमार गंगवाल उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुखा अतिथी पदी पार्श्वनाथ ब्रह्मचारी आश्रम चे महामंत्री प्रेमचंद पाटणी, माजी मुख्याध्यापक निर्मलकुमार ठोले नितिन पाटणी,संजय जैन, मनोज कासलीवाल, श्री.नंदकुमार गोसावी, गौरव गाडेकर, प्रशांत मोहळे, कल्याणी मोहळे, अमित जोगी, श्रावणी जोगी, सुषमा सुगंधी, अमोल सुगंधी, दीक्षा सुगंधी, मनीष गोसावी, प्रणाली गंगवाल, वेरूळ गावचे माजी सरपंच प्रकाश पाटील सोसायटीचे चेअरमन किशोर काळे जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष विजय भालेराव, उपसरपंच विजय राठोड रमेश ढिवरे, श्रीकांत भालेराव, नामदेव बकाल, प्राचार्य विजय रणनवरे, विलास काळे, मोबिन शेख, ग्राम सेवक गायकवाड, नाना मिसाळ, अनिल मिसाळ इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला



राष्ट्रगीत, नमोकार महामंत्र प्रतिज्ञा संविधान महाराष्ट्र राज्य गीत गाऊन तिरंग्याला अभिवादन करण्यात आले.

प्रशालेचे गणित शिक्षक सुहास मिश्रीकोटकर यांनी विद्यार्थ्यांना व सर्व शिक्षकांना नशा मुक्त भारत प्रतिज्ञा दिली तसेच भारताच्या ८० व्या स्वलिखित 'शौर्यगाथा' ही कविता सादर करून स्वातंत्र्याचे महत्त्व विषद केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रमाचे प्रास्ताविक यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक सुकुमार नवले यांनी केले आपल्या प्रास्ताविकामध्ये शाळेला तालुक्यातून मुख्यमंत्री आदर्श शाळा योजनेअंतर्गत प्राप्त झालेला प्रथम क्रमांक तसेच शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी आधुनिक विविध भौतिक सुविधा व शालेय गुणवत्ता प्रयोगशाळा ग्रंथालय कॉम्प्युटर लॅब इत्यादी बद्दलची माहिती उपस्थित सर्वांसमोर आपल्या मनोगतातून व्यक्त केली. प्रशालेचे क्रीडा शिक्षक आशिष कान्हेड तेजस्विनी बाहेती यांच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी कवायत सादर केली तर स्वप्निल गोसावी वीरेंद्र वाकळे यांच्या मार्गदर्शनात समृद्धी मिसाळ मानसी दळे सिद्धी काळे साक्षी मालोदे साक्षी सोनवणे मानवी गायकवाड आकाश वढवकर भावेश जैन लवेश जैन आर्शिया शेख या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनावर तयार करण्यात आलेल्या भितीपत्रकाचे पाहुण्यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. आराध्या ज्ञानेश्वर मिसाळ, गौरी गायके, गायत्री श्रीखंडे या विद्यार्थिनींनी स्वातंत्र्य दिनावर आपले मनोगत व्यक्त केले यावेळी अमित जोगी, प्रेमचंद पाटणी, प्रफुल्ल पारखी गौरव गाडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. स्टेट बँक ऑफ इंडिया वेरूळ शाखेतर्फे सर्व विद्यार्थ्यांना केळी वाटप करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन अन्नदाते, प्रतीक्षा दगडफोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन महेंद्र वाकळे यांनी केले अशी माहिती श्री सुहास मिश्रीकोटकर, अतुल बांदे, पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# हडको टीव्ही सेंटर भागात अनधिकृत बॅनर-पोस्टरविरोधात महानगरपालिकेची धडक मोहीम

**एकाच दिवसात १.५ लाखांहून अधिक दंडाची वसुली; १०० पेक्षा अधिक आस्थापनांची तपासणी, २० व्यावसायिकांवर कारवाई**

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे विद्रुपीकरण करणाऱ्या अनधिकृत बॅनर, पोस्टर, माहिती फलक, भिंतीपत्रके, पाम्प्लेट आदींविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आता आक्रमक भूमिका घेतली असून, मंगळवारी (दि. १८ ऑगस्ट) हडको टीव्ही सेंटर परिसरात महानगरपालिकेच्या पथकांनी धडक मोहीम राबवून एकाच वेळी मोठी दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत एकाच दिवसात दीड लाख रुपयांहून अधिक दंड ठोठावण्यात आला आहे.

महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त श्री. नंदकिशोर भोंबे यांच्या नियोजनानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली. नागरिक मित्र पथक तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पथकांनी एकाच वेळी हडको टीव्ही सेंटर परिसरातील विविध व्यावसायिक भागांमध्ये पाहणी करून अनधिकृत जाहिरात साहित्य लावणाऱ्या आस्थापनांवर कारवाई केली.

हडको टीव्ही सेंटर हा शहरातील महत्त्वाचा व्यापारी व व्यावसायिक परिसर असून या भागात विविध प्रकारच्या आस्थापनांची मोठी संख्या आहे. मोहिमेदरम्यान १०० पेक्षा अधिक व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये अनधिकृत बॅनर, पोस्टर, माहिती फलक, भिंतीपत्रके, पाम्प्लेट तसेच इतर जाहिरात साहित्य आढळून आलेल्या २० आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कारवाई करण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये कोचिंग क्लासेस, हॉस्पिटल, हॉटेल, साडी व कापड दुकाने, खानावळी, शॉपिंग मॉल तसेच इतर विविध व्यावसायिक आस्थापनांचा समावेश आहे. संबंधित आस्थापनांनी सार्वजनिक ठिकाणी किंवा नियमांचे उल्लंघन करून जाहिरातीचे साहित्य लावल्याचे आढळून आल्यानंतर महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार दंड आकारण्यात आला.

कारवाईदरम्यान संबंधित आस्थापनांच्या उल्लंघनाचे स्वरूप व प्रमाण लक्षात घेऊन सुमारे ५ हजार रुपयांपासून ते ५० हजार रुपयांपर्यंत विविध रकमेचा दंड आकारण्यात आला. सर्व कारवायांमधून एकत्रितपणे १.५० लाख रुपयांपेक्षा अधिक दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या या अचानक झालेल्या कारवाईमुळे परिसरातील व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली. सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे जाहिरातबाजी करण्यापूर्वी संबंधित व्यावसायिकांनी महानगरपालिकेचे नियम व परवानगीची प्रक्रिया यांचे पालन करणे आवश्यक असल्याचे




प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

हडको टीव्ही सेंटर परिसरातील कारवाई ही केवळ एकदिवसीय कारवाई नसून, शहरातील अनधिकृत बॅनर-पोस्टरविरोधात व्यापक मोहीमेची सुरुवात असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा, व्यावसायिक परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावण्यात आलेले बॅनर, पोस्टर व जाहिरात फलक यांची तपासणी करून संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

अनधिकृत जाहिरातींमुळे शहराचे सौंदर्य आणि सार्वजनिक परिसराची शिस्त बिघडत असून, रस्ते व चौकांचे विद्रुपीकरण होत आहे. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी महानगरपालिकेने नियमित स्वरूपात विशेष पथके तैनात करून कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणाऱ्या व्यक्ती व आस्थापनांवरही यापुढे कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकताना आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. गंभीर स्वरूपाच्या किंवा वारंवार होणाऱ्या उल्लंघनाच्या प्रकरणांमध्ये आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई व गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी सांगितले की, 'शहरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी अनधिकृत बॅनर, पोस्टर आणि जाहिरात साहित्य लावल्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्य आणि स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. हडको टीव्ही सेंटर परिसरातील कारवाईनंतर आता शहरातील इतर भागांमध्येही अशाच प्रकारे नियमितपणे तपासणी व दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.'

तसेच नागरिक व व्यावसायिकांनी जाहिरातीसाठी बॅनर, पोस्टर किंवा इतर साहित्य लावताना महानगरपालिकेच्या नियमांचे पालन करावे, अनधिकृतपणे जाहिरात साहित्य लावू नये आणि शहराच्या स्वच्छता व सौंदर्य राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही आयुक्तांनी केले. महानगरपालिकेच्या या मोहिमेमुळे शहरातील सार्वजनिक जागांवर बेकायदेशीरपणे बॅनर-पोस्टर लावण्याच्या प्रवृत्तीला आळा बसण्यास मदत होणार असून, 'स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध छत्रपती संभाजीनगर' या उद्दिष्टाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवयव प्रत्यारोपणासाठी ७९८ रुग्णांना १५.७९ कोटींची मदत

* * १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत : १५.७९ कोटींची मदत
* मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली.
* यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली.
* फुप्फुस प्रत्यारोपणासाठी ०३ रूग्णांना ६ लाख रूपयांची मदत देण्यात आली. तर, हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.
* मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर उपचारांसाठी लागणारा वेळ कमी करणे, अर्ज प्रक्रियेतील अडथळे दूर करणे आणि गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळणे सोयीचे होणार आहे.

अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, अद्ययावत करण्यात आली आहे. गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**रामेश्वर नाईक,**
कक्ष प्रमुख,
मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो. मात्र या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत असून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ७९८ रुग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस निकामी झालेल्या अनेक रुग्णांसाठी उपचाराची नवी आशा निर्माण झाली आहे. मात्र, अशा शस्त्रक्रियांसाठी खाजगी रूग्णालयात लाखो रुपयांचा खर्च येत असल्याने अनेक गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कठीण परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून, त्यांच्या कुटुंबांनाही मोठा दिलासा मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे.

वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना गती मिळणार आहे.

# जलसंधारण सप्ताह: मुख्य अभियंता हरिभाऊ गिते यांची आज आकाशवाणीवर मुलाखत



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- जलसंधारण सप्ताहानिमित्त मृद व जल संधारण विभागाचे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते यांची बुधवार दि.१९ रोजी सकाळी ८ वा ४० मि. नी आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन मुलाखत प्रसारित होणार आहे.

शासनाच्या मृद व जल संधारण विभागामार्फत दि.१५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत जलसंधारण सप्ताह आयोजीत करण्यात आला आहे. या कालावधीत मृद व जलसंधारणाविषयी जनजागृती राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या उपक्रमाची माहिती देण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे छत्रपती संभाजीनगर व नाशिक विभागाचे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते यांनी बुधवार दि.१९ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी. मुलाखत आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन प्रसारित होणार आहे. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी त्यांच्याशी बातचीत केली आहे. बुधवार दि.१९ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी एफ.एम. १०१.७ Mhz या वाहिनीवर ही मुलाखत ऐकता येईल आणि News on AIR ॲप वर ही मुलाखत देशाच्या कोणत्याही भागात ऐकता येणार आहे.

जलसंधारण सप्ताहाचा उद्देश,यानिमित्त राबविण्यात येणारे जनजागृती उपक्रम, महावॉकेथॉन व रिल बनवा स्पर्धा तसेच अन्य उपक्रमांविषयी या मुलाखतीतून श्री. गिते यांनी माहिती दिली आहे. तसेच जलसंधारणातील विविध उपचार, मृद व जलसंधारणाचे पर्यावरणीय महत्त्व, जल चक्राचे महत्त्व, मृद व जलसंधारणाअभावी निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्या अशा विविध मुद्यांवर अभ्यासपूर्ण माहिती या मुलाखतीतून देण्यात आली आहे. श्रोत्यांनी ही मुलाखत अवश्य ऐकावी असे आवाहन कार्यक्रम अधिकारी सुजित बनसोडे यांनी केले आहे.

## बांधकाम विभाग जि.प.छत्रपती संभाजीनगर

## ई-निविदा प्रथम सुचना प्रसारण

दि.१८/०८/२०२६ पासून लेखाशिर्ष ३६०४०७२८-३१ ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत् एकुण ०४ कामांची ई-निविदा प्रसारीत करण्यात येत आहे. सदर कामाचे प्रथम प्रसारण १५ दिवस असुन इतक्या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व निविदा अटी व शर्ती WWW.MAHATENDER.GOV.IN संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषद नोंदणीकृत गर्व निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी

| अ. क्र. | योजनेचे नाव | लेखाशिर्ष | वर्ष | एकुण कामे | प्र.मा. दिनांक | एकुण प्र.मा. रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिवाया (सर्वसाधारण) २०२५-२६ | २२०२J८३३१-३१ | २०२५-२६ | ०१ काम | ३१.१२.२०२५ | १००/- |
| २ | जिवाया (सर्वसाधारण) २०२५-२६ | २२०२J८३१-४२ | २०२५-२६ | ०१ काम | २९.०९.२०२५ | २४.२०२/- |
| ३ | जिवायो (सर्वसाधारण) २०२५-२६ | २२३६-२४१३(३१) | २०२५-२६ | ०२ काम | २६.०९.२०२५ | २३.५५/- |

**स्वाक्षरीत/ -**
**कार्यकारी अभियंता (बांधकाम)**
**जिल्हा परिषद छ. संभाजीनगर**

**स्वाक्षरीत / -**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद छ. संभाजीनगर**

**स्वाक्षरीत / -**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद छ. संभाजीनगर**

## अधिसुचना

**कलम -११**

**१. भुसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३**

**२. मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.२०२५/आरबीडेस्क-४/भूसंपादन /समन्वय/सीआर-५६ दिनांक ०९.०६.२०२५**

ज्याअर्थी भुमी संपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (३० चा २०१३) च्या कलम ३ मधील पोटकलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसुल व वनविभाग अधिसुचना क्रमांक ११/२०१४/.७७/-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसुचना असा केला आहे) व्दारे, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे याला 'सदरहु अधिसुचना' संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना सदरहू कायदयाच्या कलम ३ मधील पोटकलम (ए झेड) नुसार जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, या अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे. त्याअर्थी, अनुसुची I मध्ये दर्शविलेल्या जमीनी (यापुढे त्यांचा उल्लेख 'उक्त भुमी असा करण्यात येईल') असनुसुची II मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरिता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त सार्वजनिक प्रयोजन' असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांची समुचीत शासन म्हणुन खात्री झाल्यामुळे सदरहु कायद्याच्या कलम -११ च्या पोटकलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसुचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहु भुमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसुची III मध्ये नमुद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसुची IV मध्ये नमुद केलेला आहे. आणि ज्याअर्थी, या भूमी संपादन कायद्याचे कलम ४३ पोट-कलम (१) नुसार विस्थापिताचे पुनर्वसन आणि पुनःस्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसुची V मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसुची V मध्ये माहिती देणे आवश्यक आहे.)

त्याअर्थी, आता सदरहु कायद्याच्या कलम ११ चे पोटकलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन सदरहु भुमी कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसुचित केलेल्या भुमीच्या मालकांने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट- कलमाच्या अंमलबजावणी मधुन अशा भुमी मालकांस सुट देऊ शकेल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहु भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमीसंपादन पुनवर्सन व पुनःस्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१३ (यापुढे ज्यांचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणुन त्याअर्थी, समुचीत शासन म्हणुन जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३, पोटकलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांना पदनिर्देशित करित आहे.

**अनुसुची I**

भूमी वर्णन :- मोजणी प्रमाणे

गावाचे नाव **:- मौजे मावसाळा ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर ओ.आर.क्र. ०८/०६**

| अ. क्र | सर्व्हे नंबर / गट नंबर | (RRF प्रमाणे ) |
|---|---|---|
| १ | २ | ०.२८ |
| २ | ३ | ०.१४ |
| ३ | ३ | १.२८ |
| ४ | ३ | ०.९१ |
| ५ | ३ | ०.१२ |
| ६ | ३ | ०.१७ |
| ७ | ५ | ०.१० |
| ८ | ५ | ०.३५ |
| ९ | १३ | ०.५८ |
| १० | १४ | ०.१८ |
| | **एकुण** | ४.११ |

संपादनाचे प्रयोजन **:- पाझर तलाव क्र. ०२ चे भूसंपादन मौजे मावसाळा ता. खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर ओ. आर.क्र. ०८/०६**

**अनुसुची II**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण **:- या प्रकल्पाव्दारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे**

प्रकल्पाचे नाव **:- पाझर तलाव क्र. ०२ चे भूसंपादन मौजे मावसाळा ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर ओ. आर.क्र. ०८/०६**

प्रकल्पाच्या कामाचा तपशिल **:- पाझर तलाव क्र. ०२ चे भूसंपादन मौजे मावसाळा ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर ओ.आर.क्र. ०८/०६**

सामाजिक फायदे **:- या प्रकल्पव्दारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.**

**अनुसुची III**

बाधित व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे **: विस्थापनाची आवश्यकता नाही**

सबब माहिती निरंक

**अनुसुची IV**

सामाजिक परिणामाचे निर्धारणाचा गोषवारा -

(सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे)

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३/०३/२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण छ व छछ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६/०४/२०१८ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण छ व छछ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त .

**अनुसुची V**

(१) नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती ज्या अधिका-याची प्रशासक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम :- आवश्यकता नाही.

(२) सबब माहिती निरंक

(३) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता :- निरंक

प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचनेनुसार झाली आहे त्याचा तपशिल : निरंक

टिप :- उक्त जमिनीचा / जमिनीच्या योजनेचे (plan चे) निरिक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक :-/०७/२०२६

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरीत/ -**
**(एकनाथ कांता दत्तात्रय बंगाळे)**
**उपजिल्हाधिकारी**
**भूसंपादन जायकवाडी प्रकल्प,**
**छत्रपती संभाजीनगर**

जिमाका/छ.स.न/जाहि/१६३/२०२६-२०२७